पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या आस्थापनेवरील कळमना पोलीस ठाण्याचे विभाजन करुन पारडी पोलीस ठाणे निर्माण करण्यास मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः पीओएस-२६१६/प्र.क्र.१३८/पोल-३
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
दिनांक : २१ एप्रिल, २०१८.

वाचा :-

१) गृह विभाग, शासन निर्णय क्र.पीओएस-२६९६/४८७८/प्र.क्र.न.बा-७२/पोल-३, दि. २१.०७.१९९७.
२) पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे पत्र क्र.पोआना/जी-७/नवीन पो.स्टे.पारडी/निर्मिती प्रस्ताव/२०१६/७६३, दि. ०४.०५.२०१६.
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/पो आ नागपूर शहर (पारडी)/१६२/२०१६, दि.०६.१०.२०१६.
४) पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे पत्र क्र.पोआना/जी-७/नवीन पो.स्टे.पारडी/निर्मिती प्रस्ताव/२०१६, दिनांक १५.०५.२०१७.
५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/पो आ नागपूर शहर (पारडी)/१६२/२०१६, दि.२९.०५.२०१७.
६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/पो आ नागपूर शहर (पारडी)/१६२/२०१६, दि.१५.१२.२०१७.
७) मा.उच्चस्तर सचिव समितीच्या दिनांक १८.१२.२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त.
८) सह सचिव तथा सदस्य सचिव, उच्चस्तर सचिव समिती, वित्त विभाग यांचे पत्र क्र. पदनि-२०१७/प्र.क्र.८३/१७/आ.पु.क., दि.१८.०१.२०१८.

प्रस्तावना :-

पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या आस्थापनेवर उपरोक्त संदर्भाधिन क्र.१ येथे नमूद दिनांक २१.०७.१९९७ च्या शासन निर्णयान्वये कळमना पोलीस ठाणे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर कळमना पोलीस ठाणे परिसरात व लोकसंख्येत मोठी वाढ झालेली असुन ती सुमारे तीन लाखाचे वर गेलेली आहे. उक्त कळमना पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्र मोठे असल्यामुळे कामाचा ताण वाढला आहे. सदर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रामधील पारडी परिसरालगत राष्ट्रीय महामार्ग क्र.६ जात असुन, हैद्राबाद-जबलपुर बायपास मार्ग व दोन मोठया औद्योगिक वसाहती आहेत. सदर परिसरामध्ये अपघाताचे व विद्युत चोरीचे प्रमाण जास्त आहे. सदर परिसरात सतत निर्माण होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या प्रसंगामुळे नविन पोलीस ठाणे

निर्माण करण्याची अत्यंत गरज निर्माण झाली आहे. उक्त बाबींचा विचार करुन सदर परिसरामध्ये कायदा व सुव्यवस्था राखणे व गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उक्त संदर्भाधिन क्र.३ येथे नमूद दिनांक ०६.१०.२०१६ च्या पत्रान्वये पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या आस्थापनेवरील कळमना पोलीस ठाण्याचे विभाजन करुन प्रस्तावित पारडी पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. तद्नंतर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उक्त संदर्भाधिन क्र.६ येथे नमूद दिनांक १५.१२.२०१७ च्या पत्रान्वये प्रस्तावित पारडी पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा सुधारीत प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.उच्चस्तर सचिव समितीने दिनांक १८.१२.२०१७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये पारडी पोलीस ठाणे निर्माण करण्यास व तद्नुषंगाने पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची १५८ पदे निर्माण करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u>:-

पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या आस्थापनेवरील कळमना पोलीस ठाण्याचे विभाजन करुन पारडी पोलीस ठाणे निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त नवनिर्मित पारडी पोलीस ठाण्याकरिता पोलीस दलातील खालील तक्त्यात नमूद विविध संवर्गातील १५८ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी	पदसंख्या
१.	पोलीस निरीक्षक	रु.९३००-३४८००+ ग्रेड पे ५०००	०२
२.	पोलीस उपनिरीक्षक	रु. ९३००-३४८००+ ग्रेड पे ४३००	१०
३.	सहायक पोलीस उपनिरीक्षक	रु.५२००-२०२००+ ग्रेड पे २८००	१०
४.	पोलीस हवालदार	रु.५२००-२०२००+ ग्रेड पे २४००	४५
५.	पोलीस शिपाई	रु.५२००-२०२००+ ग्रेड पे २०००	८५
६.	चालक पोलीस शिपाई	रु.५२००-२०२००+ ग्रेड पे २०००	०६
		एकुण पदे -	**१५८**

३. उपरोक्त तक्त्यात नमूद करण्यात आलेली पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची पदे त्यासाठी केलेल्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार भरण्यात यावीत.

४. सदर नवनिर्मित पारडी पोलीस ठाणे निर्माण करण्यासाठी येणारा आवर्ती खर्च व अनावर्ती खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१२८/१८/व्यय-७, दिनांक १०.०४.२०१८ अन्वये वित्त विभागाने तसेच मा.उच्चस्तर सचिव समितीने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२११६०८५५५४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dhiraj K Abhang

Digitally signed by Dhiraj K Abhang
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b83edfcbaa0fddb5983e8303bccd9a96ef7cc55853b8b449ff8dc53d69f1618d, cn=Dhiraj K Abhang
Date: 2018.04.21 16:12:17 +05'30'

(धीरज कां. अभंग)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. मा.राज्यमंत्री,गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव.
३. मा.राज्यमंत्री,गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव.
४. मा.मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. पोलीस आयुक्त, नागपूर शहर.
१०. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर.
११. जिल्हाधिकारी, नागपूर.
१२. पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण.
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी,वांद्रे,मुंबई.
१६. वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.
१७. निवड नस्ती, पोल-३.